महाराष्ट्र शासन
धर्मादाय सह आयुक्त, अमरावती विभाग,
अमरावती यांचे कार्यालय

गृहनिर्माण भवन, दुसरा मजला
मालटेकडी समोर, टोपेनगर अमरावती-४४४६०२
दुरध्वनी क्रमांक -०७२१ २६६३३०८

Gruhnirman Bhavan, 2ndfloor
Infront of altekdi,Tope nagar,
Amravati 445602
Phone no. 0721-2663308

Email ID: supdtest.am-mh@gov.in

जा. क. आस्था/सफाईगार/5981 /२०२५ दिनांक १४.०८.२०२५

14 AUG 2024

प्रति,

मा. धर्मादाय आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय :- या कार्यालयात सफाईगार या पदाची सेवा प्राप्त करून घेण्यासाठी निविदा मागविण्याकरीता आपल्या वेब साईट वर जाहीर प्रसिध्दीकरण करणे बाबत.

संदर्भ :- आपले पत्र २९४ दिनांक १२.०१.२०२४

माननीय महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यात येते की, संदर्भीय पत्रान्वये सफाईगार या पदाची बाह्ययंत्रणेद्वारा सेवाप्राप्त करण्याबाबत कार्यवाही करावयाची असल्यास त्याबाबत स्वतंत्र प्रस्ताव मालमत्ता शाखेस सादर करावा असे निर्देश दिलेले आहे. त्याप्रमाणे दिनांक १४.०८.२०२५ रोजी या कार्यालयातील गट ड कर्मचारी निवड समितीची सभा घेवून सफाईगार या पदाची सेवा प्राप्त करण्यासाठी निविदा प्रक्रीया राबविण्याचे ठरविले.

त्याबाबचे जाहीर प्रसिध्दीकरण http:// charity.maharashtra.gov.in या साईट वर दिनांक १९.०८.२०२५ रोजी करण्यासाठी निविदा सुचना या पत्रा सोबत सादर करण्यात येत आहे.

तरी विनंती की, सोबत जोडलेले जाहीर प्रसिध्दीकरण व निविदा सुचना http:// charity.maharashtra.gov.in या साईट वर दिनांक १९.०८.२०२५ रोजी प्रसिध्द करावी ही विनंती.

सोबत :- जाहीर प्रसिध्दीकरण व निविदा सुचना

आपला विश्वासु

14/8/2025

(श्री. दिपक द. खोचे)
धर्मादाय सह आयुक्त, अमरावती

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन
**धर्मादाय सह आयुक्त, अमरावती विभाग,**
**अमरावती यांचे कार्यालय**


गृहनिर्माण भवन, दुसरा मजला
मालटेकडी समोर, टोपेनगर अमरावती-४४४६०२
दुरध्वनी क्रमांक -०७२१ २६६३३०८

Gruhnirman Bhavan, 2ndfloor
Infront of altekdi,Tope nagar,
Amravati 445602
Phone no. 0721-2663308

Email ID: supdtest.am-mh@gov.in


जा. क्र. आस्था/पद भरती/5982/२०२५ दिनांक 14.08.२०२५

14 AUG 2024

## जाहीर प्रसिध्दीकरण
## निविदा /दरपत्रक ०१/२०२५

याद्वारे सर्व संबधितांना सुचित करण्यात येते की, धर्मादाय सह आयुक्त अमरावती या कार्यालयात सफाईकामगार या पदाचे कामकाज करण्याकरीता बाह्य यंत्रणे मार्फत मान्यता प्राप्त संस्था/कंपनी/कंत्राटदार/ठेकेदार यांचे कडुन उमेदवाराची सेवा कंत्राटी तत्वावर उपलब्ध करून घेण्यास प्रस्ताव मान्यते करीता मा. धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य यांना सादर करण्याचे सुचित केले आहे.

सबब मान्यताप्राप्त संस्था/कंपनी/कंत्राटदार/ठेकेदार यांचे कडुन कंत्राटी तत्वावर सफाईगार या पदाकरीता तात्पुरत्या कंत्राटी स्वरूपात ११ महीन्याच्या कालावधी करीता सेवा उपलब्ध करून देण्याचे कामी निविदा/दरपत्रक मागविण्यात येत आहे. तसेच सदर निविदा कार्यक्रम खालील प्रमाणे राबविण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | जाहीर नोटीस प्रसिध्द करणे(कार्यालयीन नोटीस बोर्ड) | १८.०८.२०२५ |
| २ | http;//charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे | १९.०८.२०२५ |
| ३ | निविदा स्वीकारण्याबाबत अंतीम तारीख | २६.०८.२०२५ |
| ४ | निवड समिती समोर निविदा उघडण्याची तारिख | २८.०८.२०२५ सायंकाळी ३.०० वाजता |
| ५ | निवड समिती समोर निविदा उघडल्यानंतर आदेशानंतर तुलनात्मक तक्ता तयार करणे व एल-१ ची निवड करणे | २९.०८.२०२५ |

टिप :- संबधित निविदा धारकाने अथवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधीनी दिनांक २८.०८.२०२५ रोजी ३.०० वाजता धर्मादाय सह आयुक्त कार्यालय अमरावती येथे उपस्थित रहावे.

13/8/2025
(दिपक द. खोचे)
धर्मादाय सह आयुक्त, अमरावती

प्रत,

मा. धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई
कार्यालयीन नोटीस बोर्ड करीता
कार्यालयीन आदेश धारीणी

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन
**धर्मादाय सह आयुक्त, अमरावती विभाग,**
**अमरावती यांचे कार्यालय**

गृहनिर्माण भवन, दुसरा मजला
मालटेकडी समोर, टोपेनगर अमरावती-४४४६०२
दुरध्वनी क्रमांक -०७२१ २६६३३०८

Gruhnirman Bhavan, 2ndfloor
Infront of altekdi,Tope nagar,
Amravati 445602
Phone no. 0721-2663308

Email ID: **supdtest**.am-mh@gov.in

जा. क. आस्था/पद भरती 5983 /२०२५ दिनांक . 14.08.२०२५

1 4 AUG 2024

निविदा सुचना

(निविदा कमांक ०१/२०२५)

विषय :- सफाईगार या पदाची कामे बाहय यंत्रणेद्वारे करून घेणे बाबत.

मा. धर्मादाय सह आयुक्त अमरावती या कार्यालयात सफाईगार या पदाचे खाली दर्शविलेल्या रिक्त जागेच्या गोषवा-याप्रमाणे ११ महिन्याच्या कंत्राट कालावधी करीता कंत्राटी तत्वावर सेवा पुरविण्यासाठी नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार/कंपनी/संस्थे कडुन प्रत्यक्षरित्या निविदा दिनांक २६.०८.२०२५ रोजी दुपारी पाच(५) वाजे पर्यंत वरील नमुद या कार्यालयाच्या पत्त्यावर मागविण्यात येत आहे. निविदा लिफाफयावर (कंत्राटी) पदाकरीता निविदा तसेच निविदा देणा-याचे नाव नमुद करणे आवश्यक आहे.

सदरची निविदा http;//charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

निविदा मागविणा-या कार्यालयाचे नाव :- धर्मादाय सह आयुक्त अमरावती

कामाचे स्वरूप व जबाबदारी :- धर्मादाय सह आयुक्त कार्यालय अमरावती कार्यालयात बाहययंत्रणे द्वारे सफाईगार पदाची सेवा उपलब्ध करून देणे. सफाईगार पदावर बाहय यंत्रणेद्वारे खालील प्रमाणे कामाचे स्वरूप राहील.

१. सफाईगारचा प्रत्येक दिवसाचा कामाचा कालावधी ९.३० ते ६.३० असा राहील.
२. कार्यालयातील संडास, बाथरूम, कार्यालयीन परिसर कोर्ट हॉल, कर्मचारी बैठक व्यवस्था हॉल, ॲटी चेंबर्स, वकील संघास दिलेली जागा हया स्वच्छ ठेवणे ही कंत्राटी सफाईगाराची जबाबदारी असेल. तसेच वेळोवेळी सांगीतलेली इतर कार्यालयीन कामे करावी लागेल.
३. सफाईगार यांची वर्तणुक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्याचे उत्तरदायित्व हे कार्यालयाच्या हित संबधाची रक्षा करण्याची राहील.
४. कंत्राटी सफाईगाराचे कार्यक्षेत्र कार्यालय व कार्यालयीन परिसर असेल.
५. धर्मादाय सह आयुक्त, धर्मादाय उप आयुक्त व सहायक धर्मादाय आयुक्त हे ज्यावेळी कार्यालयीन कामावर बोलावतील त्यावेळीस तत्परतेने कार्यालयात कामावर यावे लागेल.

Scanned with CamScanner

**सफाईगार उमेदवाराची पात्रता**

१. उमेदवाराचे वय किमान १८ व कमाल ४५ असावे.

२. उमेदवार किमान दहावी उत्तीर्ण असावेत.

३. उमेदवार शासकीय/निमशासकीय/खाजगी संस्थेमध्ये सफाईगार कामाचा तीन वर्षाचा अनुभव असावा.

४. उमेदवार सफाईगार कामासाठी मानसिक/शारीरिक दृष्टया पात्र असल्याबाबत सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. उमेदवाराचा सफाई कामाचा अभिलेख स्वच्छ असावा.

५. उमेदवारास मराठी, हिंदी भाषा वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

६. उमेदवार निर्व्यसनी असावा, गुन्हेगारी पार्श्वभुमीचा नसावा.

७. उमेदवारास साफसफाईची प्राथमिक माहिती असावी.

Scanned with CamScanner

## निविदा प्रकीया

संपुर्ण निविदा प्रकीया प्रत्यक्षरित्या निविदा असून ती तांत्रिक निविदा लखोटा(Technical Envelope (B-1)) व आर्थिक लखोटा (Financial Bid Envelope (B-2)) अशा दोन लखोटा पध्दतीने राहील. तरी दोन्ही लखोटे स्वतंत्र दयावे. सदर लखोटयावर तांत्रिक लखोटा/आर्थिक लखोटा असे नमुद करावे व कंत्राटदाराचा स्टॅम्प /सिल लावावे.

अ) तांत्रिक निविदा :

१. निविदा सादर करणे करीता अर्ज (सोबत नमुना)
२. निविदाकाराने सफाईगार (कंत्राटी) यांची सेवा केंद्र/ राज्य शासन व इतर अन्य आस्थापने मध्ये पुरविली असल्यास त्या बाबतचे संबधित कार्यालयाचे जारी केलेले कायदिश आणि कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र (अनुभवाचे अट शिथील करण्याचे अधिकार निवड समितीस राहील.)
३. कंपनीचे/संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
४. (Professional Tax) व्यवसाय कर प्रमाणपत्र
५. ई. पी. एफ (Employees Provident Fund) नोंदणी प्रमाणपत्र
६. E.S.I.C.नोंदणी प्रमाणपत्र.
७. आयकर विभागाने जारी केलेले पॅन कार्ड
८. वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (Service Tax)
९. मागील तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र
१०. निविदेसोबत जोडलेले सर्व कागदपत्रे साक्षांकित तसेच निविदाकाराची सही, शिक्कासह असणे आवश्यक आहे.
११. काळया यादीत न टाकल्याबाबत/बंदी न घातल्याबाबत प्रमाणपत्र.
१२. निविदे मधील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र

वर नमुद केलेली सर्व कागदपत्रे वर दिलेल्या कमानेच सादर करावी. तसेच तांत्रिक निविदा लखोटा मध्ये उपरोक्त नमुद केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर करण्यात याव्यात, कंत्राटदाराने निविदा अर्जासोबत सदर प्रमाणपत्रे सादर न केल्यास, निविदा अर्ज निविदा प्रकीयेतून बाद ठरविण्यात येईल. कागदपत्राच्या पुर्ततेबाबत अटी शिथील करण्याचे अधिकार निवड समितीस(खरेदी समितीस) राहतील.

सर्व प्रथम तांत्रिक निविदा उघडण्यात येईल. तांत्रिक निविदा उघडतांना निविदाकार अथवा त्याचे प्राधिकृत केलेले प्रतिनिधींनी हजर राहणे आवश्यक आहे व त्यावेळेस त्यांनी प्रमाणपत्राच्या मुळ प्रती पडताळणीसाठी हजर ठेवणे आवश्यक आहे. जर निविदाकार तांत्रिक निविदेमध्ये नमुद केलेल्या बाबींची पुर्तता करीत नसेल तर त्याची निविदा अपात्र ठरविण्यात येईल व सदर निविदाकारांची निविदा पुढील

Scanned with CamScanner

कार्यवाहीसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही. पात्र ठरणा-या निविदाकारांचीच आर्थिक निविदा उघडण्यात येईल. आर्थिक निविदेमधील रक्कम तांत्रिक निविदेमध्ये नमुद करण्यात येऊ नये. जर तसे आढळल्यास संबधित निविदाकाराची निविदा बाद ठरविण्यात येईल.

ब) आर्थिक निविदा :-

निविदेचे दर हे दरपत्रकामध्ये सर्व करासहित नमुद करावेत. आर्थिक निविदेमध्ये निविदाकाराने नमुद केलेले दर निविदेमधील सर्व अटी व शर्तींची पुर्तता करीत असेल, तर पुढील कार्यवाहीसाठी निविदा ग्राह्य धरण्यात येईल. निविदा स्वीकारण्याचा अधिकार या कामासाठी नियुक्ती केलेल्या खरेदी समितीला असेल व कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार सदर समितीला असेल.

कंत्राटदार/ठेकेदार/कंपनी/संस्थेचे संपुर्ण नाव :-
कंत्राटदार/ठेकेदार/कंपनी/संस्थेचा संपुर्ण पत्ता :-
कंत्राटदार/ठेकेदार/कंपनी/संस्थेचा संपर्क दुरध्वनी :-
कंत्राटदार/ठेकेदार/कंपनी/संस्थेचा नोंदणी क्रमांक :-
कंत्राटदार/ठेकेदार/कंपनी/संस्थेचा सेवाकर क्रमांक :-

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | आवश्यक असलेल्या सफाईगार पदावरील कर्मचारी संख्या | मागणी केलेल्या सफाईगार पदासाठी कंत्राटदाराने मागणी केलेली रक्कम (प्रती महिना)/प्रती व्यक्ती | सेवा कर | एकूण रक्कम रूपये (स्तंभ ४+५) | सर्व करासहित १२ महिन्याची एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | धर्मादाय सह आयुक्त, कार्यालय अमरावती | २ | | | | |

वरील तक्त्यात अ. क. ४ ते ७ हया स्तंभातील माहिती कंत्राटदाराने भरावयाची आहे. आर्थिक निविदा कंत्राटदाराने सही/शिक्क्यानिशी असावी

Scanned with CamScanner

क) पात्र निविदाकाराने/पुरवठादाराने करावयाच्या कार्यवाही बाबत:-

१. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-२०१४/प्रक८२/भाग/उद्यसेग दिनांक ०१.१२.२०१६ मधील प्रकरण क्रमांक ४/अ.क्र.४.६ मधील तरतुदीनुसार निविदा मान्य झालेल्या कंत्राटदारास/पुरवठादारास निकाल कळविल्या नंतर १५ दिवसांच्या आत सुरक्षा ठेव अनामत (Performance Security Deposit) रू. १००००/-(दहा हजार) चा या अमरावती ठिकाणी प्रदेय असणारा राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष (डिमांड ड्रफट) धर्मादाय उपआयुक्त, अमरावती यांचे नावे दयावी लागेल. विहित मुदतीत सुरक्षा ठेव अनामत जमा न केल्यास विहित नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२. पत्र कंत्राटदाराने/पुरवठादाराने कामाचे आदेश देण्यापुर्वी रूपये ५००/- चे मुद्रांक पेपर वर करारनामा करून देणे आवश्यक राहील.

३. करारनामा केल्यानंतर कंत्राटदाराने विहित मुदतीत आवश्यकतेप्रमाणे मनुष्यबळ पुरवठा न केल्यास विहित नियमानुसार विलंब आकार/दंड आकारला जाईल. सदर दंडाची वसूली प्रशासकीय सेवा आकार किंवा सुरक्षा ठेव अनामुत रकमेतून करण्यात येईल.

४. कंत्राटदारकडुन/पुरवठादाराकडुन करारनाम्यातील कोणत्याही अटींचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रद्द करण्यात येतील व त्याला कोणतीही रक्कम प्रदेय राहणार नाही. जमा केलेल्या सुरक्षा ठेव अनामत रक्कम जप्त केली जाईल.

५. धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य/ धर्मादाय सह आयुक्त अमरावती यांना कोणत्याही वेळी कारण न दर्शविता निविदाकारास एक महिन्याची आगावू, नोटीस देवून करारनामा रद्द करण्याचा/संपुष्टात आणण्याचा अधिकार असेल.

Scanned with CamScanner

## बाहययंत्रणे मार्फत मनुष्यबळ (सफाईगार) पुरविणा-या संस्थासाठी अटी व शर्ती

१. कंत्राटदाराने कार्यालयाचे कामकाजासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायदयातील तरतुदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले, तर संबधित कंत्राटदारावर किमान वेतन कायदयातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्याचे कंत्राट तात्काळ रद्द करून त्यांचे नाव काळया यादीत टाकण्याची कारवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

२. कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांन कामाचे वेतन व त्या अनुषंगिक इतर सर्व रोख स्वरूपात अदा न करता संबधित कामगाराच्या नावाने रेखांकित धनादेशाद्वारेच (Account Payee Cross Cheque) अदा करावेत.

३. कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराला दिलेल्या धनादेशची छायांकित प्रत, सदर धनादेश स्वीकारल्याची कंत्राटी कामगाराची स्वाक्षरी असलेले वेतन देयक ज्यावर सदर धनादेश क्रमांक लिहीलेला असेल, कंत्राटदाराने दरमहा संबधित कार्यालयास सादर करावे लागतील, जो पर्यंत कंत्राटदार वरील कागदपत्रे सादर करणार नाहीत, तोपर्यंत त्या महिन्याचे कंत्राटदाराचे देयक अदा करण्यात येणार नाही.

४. कंत्राटाचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत ११ महिन्यापेक्षा जास्त राहणार नाही.

५. आवश्यकता भासल्यास त्याचे ऐवजी दुसरा कामगार उपलब्ध करून देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

६. सुट्टीच्या दिवशी कंत्राटी कामगारांकडुन काम करून घेतल्यास त्या दिवसाची बदली रजा देण्यात येईल. मात्र अशी बदली रजा देतांना त्या दिवशी कार्यालयातील कामकाचा खोळंबा होवू नये म्हणून दुस-या कामगाराची सोय करण्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

७. शासकीय कामाचे वेळेनंतर कंत्राटी कामगारांना जास्तीचे शासकीय काम करावे लागल्यास त्यांना अतिकालीन भत्ता देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालीक भत्ता देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

८. सफाईगार वेळेवर कार्यालयात उपस्थित न झाल्यास किंवा विना परवानगी गैरहजर राहिल्यास त्याचे त्या दिवसाचे वेतन अदा करण्यात येणार नाही. तसेच सफाईगार रजेवर असल्यास पर्यायी सफाईगार पुरविणे बंधणकारक राहील.

९. कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना कार्यालयात हजर होतांना व कार्यालय सोडतांना बायोमेट्रीक प्रणालीवर अगर हजेरी

Scanned with CamScanner

पटावर त्यांची उपस्थिती नोंदविणे बंधनकारक असेल सदर नोंदणीसाठी होणारा संपुर्ण खर्च कंत्राटदाराने उचलावयाचा आहे.

१०. कंत्राटदारास त्यांनी नेमलेल्या कंत्राटी सफाईगार /कामगार यांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार वेतन, इतर सवलती व सेवा शर्ती लागू करणे बंधनकारक असेल.

११. ज्या कंपनीस/ संस्थेस काम सोपविण्यात येईल त्यांनी त्या बाबतच्या अटी व शर्ती नुसार करार करणे आवश्यक राहील.

१२. कंपनी/संस्थेतर्फे काम करणा-या कर्मचा-यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा या कार्यालयावर राहणार नाही.

१३. सदरील निविदेस शासनाकडुन प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळाल्यानंतर ती अमलात येईल.

१४. कंत्राटदारामार्फत दिल्या जाणा-या वरील सेवा/सुविधा इत्यादी बाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल व वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

१५. कार्यालयास कंत्राटी पध्दतीवर पुरविण्यात येणा-या सोई-सुविधा/काम यांचेसाठी जी कंत्राटी सेवा कंत्राटदारांमार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने लागू असणारे सर्व कर कंत्राटदाराने अदा करावेत.

१६. कंत्राटदार/संस्था/कंपनी यांनी कंत्राटी सेवा उपलब्ध करून देतांना शासन निर्णय विधि व न्याय विभाग कमांक पदन २५१२/प्रक. १५७/का.१२ दिनांक २७.०१.२०१५ व शासन निर्णय, विधि व न्याय विभाग के, कंत्राटी २०१६/प्र.क्र. १९४/ का-१२ दिनांक २३.०२.२०१७ मधील निर्देशांचे काटेकोर पणे पालण करणे बंधनकारक आहे. शासन निर्णय शासनाच्या www. maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१७. उपरोक्त कामासाठी कंत्राटदारामार्फत ज्यांना काम देण्यात येणार आहे त्यांना नियमित कर्मचा-यांप्रमाणे नियम व अटी व शर्ती लागू राहणार नाही तसेच त्यांना नियमित कर्मचा-यांप्रमाणे कोणतेही वेतन व भत्ते तथा अनुषंगिक लाभ अनुज्ञेय /लागू राहणार नाही त्यांचा सेवा कालावधी किंवा कर्तव्य कालावधी व मानधना बाबत हे कार्यालय कसल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

१८. नियुक्ती प्राधिका-यांने सुचविलेली सर्व कामे तसेच आयत्यावेळे कामाचे स्वरूप बदलल्यास त्याप्रमाणे, कंत्राटदार संस्था/कंपनी यांनी कामे करून देण्याचे त्यांचे वर बंधनकारक राहील त्याबाबत कोणतेही तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही.

Scanned with CamScanner

१९. कंत्राटदाराने कंत्राटी कामकार पुरवितांना बाल कामगारांचा समावेश होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

२०. कंत्राटदारासह कंत्राटी कामाचा मोबदला अदा करतांना त्यातुन नियमाप्रमाणे आयकर कापुन घेण्यात येईल.

२१. कंत्राटी कामगारांनी कार्यालयात काम करतांना त्यांच्या नजरेस ज्या काही बाबी येतील, त्या कार्यालयीन बाबी आहेत याची जाणीव ठेवून त्या संबधात आवश्यक ती गोपनीयता ठेवणे तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही याची दक्षता घेणे, या बाबी कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

२२. कंत्राटदारा मार्फत नेमलेल्या कंत्राटी कामगाराकडुन सरकारी मालमत्तेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास, नुकसान भरपाईची रक्कम कंत्राटदार यांना देय असलेल्या रकमेतून वसुल करण्यात येईल.

२३. केवळ निविदा भरली म्हणून कंत्राटावर हक्क सांगता येणार नाही.

२४. कंत्राटदारास कंत्राटाचे संबधात कोणत्याही प्रकारची आगावू रक्कम दिली जाणार नाही.

२५. कंत्राटदारास पुर्वीचे कामाचा अनुभव असल्यास त्याने निविदेसोबत अनुभवाचे प्रमाणपत्र हजर करणे आवश्यक राहील.

२६. कंत्राटदाराने नियुक्त कामगारांना सुरक्षे अंतर्गत फायदे, तसेच पी.एफ. आणि एम. पी. ॲक्ट, १९५२ अंतर्गत असलेले फायदे देणे बंधनकारक राहील.

२७. निविदाधारकास अस्तीत्वात असलेल्या अनुषंगिक सर्व कायदयाचे नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

२८. सदरील कर्मचा-यांना अपघात झाल्यास खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कर्मचा-यांकडुन कार्यालयास/इतरांस नुकसान झाल्यास खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२९. नियुक्त केलेला कर्मचारी हा नेहमी स्वच्छ, निरोगी, व विहित केलेल्या गणवेषात व छातीवर ओळखपत्र लावलेले असले पाहीजे याची दक्षता कंत्राटदारास घ्यावी लागेल. नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची यादी आणि त्यांचा पुर्व इतिहास या बाबतची सर्व माहिती कार्यालयास पुरवावी लागेल. नियुक्त कर्मचा-यास कोणतेही संसर्गजन्य रोग होणार नाही याची दक्षता संबधित कंत्राटदाराने घ्यावी, तसेच वैद्यकीय अधिका-यांचे प्रमाणपत्र नियुक्ती वेळीस कार्यालयाकडे सादर करावेत.

Scanned with CamScanner

३०. व्यसनाधीन गुन्हेगारांशी पार्श्वभुमी असणा-या खाजगी कर्मचा-यास नियुक्ती देता येणार नाही. खाजगी कर्मचारी नियुक्ती पुर्वी अशा कर्मचा-यांची चारित्र पडताळणी प्रमाणपत्र तसेच महाराष्ट्राचा अधिवासी असल्याचे प्रमाणपत्र घेणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. सदर उमेदवारांचे दोन्ही प्रमाणपत्रे नियुक्ती वेळी कार्यालयास सादर करावेत.

३१. कंत्राटी कामगारांची नैसर्गिक आपत्ती, अपघात, इजा/जखम इतर अनुचित घटना इत्यादी कारणास्तव कोणतेही नुकसान झाल्यास खर्चाची पुर्तता (नुकसान भरपाई) करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. धर्मादाय आयुक्त कार्यालयाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. तसेच कंत्राटी कर्मचा-यांकडुन कार्यालयास/इतरास नुकसान झाल्यास खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३२. उमेदवार शासकीय कामकाजाच्या दृष्टीने वेळ पडल्यास काही अभिलेख हाताळत असतांना, त्यांनी त्या अभिलेखाच्या गोपनीयते बाबत काळजी घ्यावी. अशा प्रकारे गोपनीयते बाबत कोणताही भंग केल्यास अथवा अभिलेखातील माहितीचा दुरुपयोग केल्याचे आढळुन आल्यास उमेदवारास तात्काळ काढुन टाकण्यात येईल व त्यांचे विरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

३३. उमेदवाराला काढुन टाकल्यानंतर त्यांच्या ताब्यात असलेला सर्व शासकीय अभिलेख परत करणे त्यावर बंधनकारक असेल.

३४. करार कालावधीत उमेदवार कोणत्याही प्रकारची खाजगी काम स्वीकारणार नाही. ज्यामुळे कामकाजावर विपरित परिणाम होईल.

३५. करार कालावधित उमेदवार त्यांचे कोणतेही अधिकार, कर्तव्य व जबाबदा-या कोणत्याही तृतीय पक्षास हस्तांतरित/प्रत्यायोजित करणार नाही.

३६. करार कालावधित, उमेदवाराच्या एखादया कृतीमुळे अथवा निष्क्रियतेमुळे शासनास नुकसान झाल्यास, असे नुकसान उमेदवारांकडुन भरपाई करण्यात येईल व उमेदवारास देय असलेल्या मेहतान्या मधून नुकसान भरपाईची रक्कम वळती करण्यात येईल.

३७. करार कालावधित, उमेदवाराची सचोटी संशयास्पद आढळुन आल्यास अथवा कामकाजामध्ये निष्काळजी पणा दाखविल्यास अथवा करारातील अटी व शर्तीचा भंग केल्यास सदर करारनामा संपुष्टात येईल व उमेदवारास कोणतीही पुर्व सुचना न देता काढुन टाकण्यात येईल.

Scanned with CamScanner

३८. करारात वाढ करावयाचा निर्णय झाल्यास वेतन वाढविणे बाबत निर्णय घेवून कराराची मुदत वाढविण्याचे सर्व अधिकार शासनास असतील.

३९. शासनाच्या धोरणांमध्ये भविष्यात बदल झाल्यास, त्या नुसार या प्रकरणी कार्यवाही करण्यात येईल.

४०. कंत्राटदारास दरमहा कंत्राटीचे रक्कम मागणी करण्यासाठी तीन प्रती देयक सादर करावेत. सदर बाबत आस्थापना शाखेने प्रमाणित केल्यानंतर देयकाचे प्रदान करण्यात येईल. कार्यालयास अनुदान प्राप्त न झाल्यास किंवा इतर शासकीय कारणांने अपवादात्मक परिस्थीतीत देयक प्रदान करण्यास चार /पाच महीने इतका कालावधी प्रलंबित राहण्याची शक्यता असल्यास अशा वेळीस ठेकेदाराने त्यांच्या कामगारांना वेतन वेळेवर देणे बंधन कारक राहील.

४१. या कार्यालयातील इतर कामकाजाबाबत आस्थापना शाखेद्वारे वेळोवेळी देण्यात येणा-या आदेशाचे पालन करावे लागेल तसेच ठेकेदाराचे काम समाधानकारक नसल्यास ठेका/करार कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे अधिकार मा. धर्मादाय आयुक्त, मुंबई किंवा धर्मादाय सह आयुक्त अमरावती राहील. तसेच त्यापुढील वर्षीचा दर करार मंजुर होई पर्यंत मुदतवाढ देण्यात येऊ शकेल. सदर मुदतवाढीपुर्वी ठरलेल्या दराप्रमाणेच काम करावे लागेल. मुदतवाढ देणे अथवा नाकारणे हया बाबतचे सर्व अधिकार धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई व धर्मादाय सह आयुक्त अमरावती यांनी राखुन ठेवलेले आहेत.

४२. कायम स्वरूपी शासकीय नौकरीसाठी कार्यालयाकडे/ शासनाकडे /न्यायालयाकडे दावा अथवा खटला करणार नाही अशा आशयाचे हमीपत्र सेवेत हजर होतांना सादर करणे बंधनकारक राहील.

४३. सफाईगार उमेदवाराची कंत्राटीसेवा चालु ठेवण्याचे/संपुष्टात आणण्याचे सर्व अधिकार धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई व धर्मादाय सह आयुक्त अमरावती यांचे स्वाधीन राहतील.

४४. सफाईगाराच्या निष्काळजीपणा मुळे कार्यालयातील काही नुकसान झाल्यास संस्थेस त्यांच्या दुरूस्तीचा खर्च करावा लागेल. तसेच दुर्दैवाने सफाईगारास गंभीर स्वरूपात इजा झाल्यास त्याचा वैद्यकीय खर्चाचे अथवा नुकसान भरपाईचे कोणतेही उत्तरदायित्व हे धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई किंवा धर्मादाय सह आयुक्त अमरावती कार्यालयाकडे राहणार नाही पुर्णत: जबाबदारी संबधित कंत्राटदार संस्थेची राहील.

Scanned with CamScanner

४५. कोणतीही निविदा स्वीकारण्याचा किंवा एखादी/ सर्वच निविदा कारण न देता नाकारण्याचा अधीकार मा. धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई व धर्मादाय सह आयुक्त अमरावती कार्यालयास राहील.

४६. सदर निविदेनुसार निवड झालेल्या कंत्राटदारास कंत्राट हे मा. धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी मान्यता दिल्या नंतरच देण्यात येईल.

वर नमुद अटी व शर्तींची पुर्तता करणा-या संस्थांकडुन निविदा/दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

13/8/2025

(दिपक द. खोचे)
**धर्मादाय सह आयुक्त, अमरावती**

Scanned with CamScanner